Aarhat Publication & Aarhat Journal's

# AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Peer Reviewed Multidisciplinary Research Journal

ISSN- 2278-5655

Online and Print Journal

**EduIndex Impact Factor: 5.18**

**UGC Approved Journal No 48178, 48818**

**Vol VII Special Issues No XVI**

**Chief Editor**

**Dr.S.D.Taklkar**

Aarhat Publication & Aarhat Journal's

# AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

**Peer Reviewed Multidisciplinary Research Journal**

ISSN- 2278-5655

Online and Print Journal

**EduIndex Impact Factor: 5.18**

**UGC Approved Journal No 48178, 48818**

**Vol VII Special Issues No XVI**

**Chief Editor**

**Dr.S.D.Taklkar**

Journal On

**Aarhat Multidisciplinary Internationa' Education Research Journals**

Multidisciplinary Bi-monthly International Print/online Peer Reviewed Journal

**ISSN- 2278-5655**

**Vol VII Special Issues No XVI**

**Copyright:**

@ All rights reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording and/or otherwise, without the prior written permission of the publisher.

**Disclaimer:**

All views expressed in the journal are those of the individual contributors. The editor and Publisher are not responsible for the statements made or the opinions expressed by the authors.

**Date Of Publication: 15 April ,2018**

**Managing Editor & Publisher:**

Pramila.D.Thokle (8355852142)

**(Email Id : amierj64@gmail.com)**

**Publication :**

Aarhat Publication

108,Gokuldham Park,Dr.Ambedkar Chowk,

Near TV Tower,Badlapur(E),421503

Email ID:aarhatpublication@gmail.com.

Pr
As
K.J
Edu
Dr.
Ass
Ma
Kol
Dr.
Hea
SNI
Mu
Dr.
Ass
Fort
Bus
Dr.
P.G
B.N
Dr.
Assi
Gov
Busi
Mal
Assi
EEE
MIT

# अ नु क्र म णि का


| अ. क्र. | संशोधन लेख व लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | साहित्यप्रकारः मध्ययुगीन कविता<br>प्रा. डॉ. दत्तात्रय प्र. डुंबरे | १-६ |
| २ | कुपोषण व अन्नसुरक्षा : भारतीय जनतेचा ज्वलंत प्रश्न<br>प्रा. चंद्रप्रभा निकम | ७-१४ |
| ३ | वीरमाता जिजाबाई यांचे जीवन व कार्य (इ.स. १५९४ – १६७४)<br>प्रा. सौ. अरूणा रविंद्र वाघोले | १५-२५ |
| ४ | छत्रपती संभाजी सिद्दी संघर्ष<br>प्रा. डॉ. आर. आर. सोनवणे | २६-२९ |
| ५ | मराठी साहित्यकृतींचे माध्यमांतर : कादंबरी ते चित्रपट<br>संजय साठे | ३०-३५ |
| ६ | 73 वी घटना दुरूस्ती व पंचायत राज व्यवस्था<br>प्रा. अरूण महादेव राख | ३६-४० |
| ७ | साहित्यकृतीची शोधसमीक्षा<br>प्रा. डॉ. किरण नामदेव पिंगळे | ४१-४९ |
| ८ | एकोणीसाव्या शतकातील मराठी रंगभूमी आणि स्त्रियांचे प्रश्न<br>प्रा. डॉ. पठारे उत्तम आप्पासाहेब | ५०-५४ |

| | | |
|---|---|---|
| ९ | मराठी दलित कादंबरीतील सामाजिकता<br>डॉ. जनार्धन परकाळे | ५५-५९ |
| १० | पत्रकारिता मे हिंदी का महत्त्व<br>डॉ. मीना खरात | ६०-६५ |
| ११ | कर्नल वॉलेस: एक लोकप्रिय लष्करी अधिकारी<br>प्रा. हरिदास शंकर जाधव | ६६-७० |
| १२ | महिलांच्या दारीद्र्य निर्मुलनात सुक्ष्म वित्ताची (बचत गट) भुमिका<br>प्रा. ए. एच. घोंगडे | ७१-७८ |
| १३ | संत ज्ञानेश्वर प्रभावळीतील कवयित्री : संत जनाबाई<br>प्रा. डॉ. सुभाष देशमुख | ७९-८२ |
| १४ | वीरेंद्र जैन के उपन्यासो मे चित्रित कृषक जीवन<br>मधुकर देशमुख | ८३-९१ |
| १५ | श्री मुक्तानंद महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींच्या शारिरीक व मानसिक विकासासाठी योग प्रशिक्षण उपक्रमाची परिणाम कारकता अभ्यासणे.<br>डॉ. लीला बनसोडे | ९२-९४ |
| १६ | आदिवासी लोकगीते<br>प्रा. डॉ. बागुल एम. एम. | ९५-१०२ |
| १७ | एक अनूठे कवि जयशंकर प्रसाद<br>डॉ सविता सिंह | १०३-१०६ |

# आदिवासी लोकगीते

प्रा. डॉ. बागूल एम. एम.
अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतुर,
ता. – जुन्नर, जिल्हा – पुणे., मोबाईल – ९८६०४१८९७०
ई.मेल. – mmbagaul2012@gmail.com

प्रस्ताविक:

लोकसाहित्यात लोकगीतांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. लोकजीवनाचे आणि लोकसंस्कृतीचे सुंदर प्रतिबिंब लोकगीतात आढळून येते. लोकगीतांची परंपरा ही प्राचीन आहे. समाज जेव्हापासून उदयाला आला, तेव्हापासून लोकगीते ही निर्माण झाली आहेत असे म्हणता येईल. मनाच्या विविध भावभावनांच्या रंगछटांनी लोकगीतांचे पुष्प प्रत्येक अशिक्षित आणि सुशिक्षितांचे चित्त आकर्षित करते.

मराठी लोकसाहित्याचे दालन समृध्द असून त्यातील बराचसा भाग लोकगीतांनी व्यापलेला आहे. लोकसाहित्य म्हणजे पारंपारिक लोकजीवन पध्दती, लोक मानसाची अभिव्यक्ती, लोकश्रध्दा, लोकसमजूती, लोकभ्रम, लोकरूढी, लोकविधी, परंपरेने चालत आलेल्या प्रथा, आचार, विचार तसेच लोककला आणि मौखिक रूपातील शब्द अविष्कार इत्यादी बाबींचा समावेश लोकसाहित्यात येत असल्याने, लोकसाहित्य लोकजीवनाला व्यापले असेच म्हणता येईल. मौखिक रूपातील शब्द अविष्कारात लोककथा, लोकगीते, लोककला, लोकनृत्य, विधिनाट्य, लोकमागनि आणि उखाणे, म्हणी यांचा समावेश होतो.

आदिवासी लोकगीतांचा अभ्यास स्वातंत्र्यपूर्व काळात सुध्दा झालेला दिसून येतो पण त्याचे महत्व स्वातंत्र्योत्तर कालखंडात वाढलेले आहे. अनेक अभ्यासकांनी आदिवासींच्या झोपड्यापर्यंत जाऊन लोकगीतांचे संकलन केले. आदिवासींची लोकगीते निसर्गाशी संबंधीत आहेत. म्हणून आदिवासी लोकगीते ही पृथ्वी, सुर्य, चंद्र, आकाश, डोंगर, फुले, वृक्ष, वेली, नद्या इत्यादी निसर्ग घटकांवर लोकगीतांची निर्मिती होत असते. आदिवासी स्त्रीगीते ही त्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक, कौटूंबिक, सामाजिक जीवनाशी निगडीत असून, त्यातूनच त्यांच्या भावभावना, सुख–दु:ख प्रसंग, आचार विचार, नीतीकल्पना, धर्मकल्पना, अंधश्रध्दा इत्यादींचे प्रतिबिंब दिसून येते.

संशोधन विषयाचे महत्त्व:

परंपरेतून येणाऱ्या सातत्याच्या आणि बदलाचा विचार करता लोकगीत जुनेही नसते आणि नवेही नसते असे म्हणता येते. काळाच्या ओघात जुनी लोकगीते लोप होत जातात. आणि त्या ठिकाणी नवीन गीतांची निर्मिती होते अशा लोकगीतातील आशय परंपरेने चालत आलेले आहे. तरी त्याच्या अभिव्यक्तीची नवी पध्दती स्वीकारल्यामुळे लोकगीताला नवीनता प्राप्त होत राहते.

लोकगीते हे लोकजीवनाचा अमोल ठेवा आहे. पिढयान पिढया हा अमोल ठेवा लोकजीवनाचे जतन करून पुढच्या पिढीला आपोआप संक्रांत होत असते. लोकगीते म्हणजे 'लोकगंगा' आणि 'भावगंगा' ह्या अनेक वाटा वळणे घेत–घेत नव्या जुन्यांचा स्वीकार करीत करीत प्राचीन काळापासून अखंडपणे वाहत आलेल्या आहे आणि ती कित्येक पिढ्या अशीच वाहत राहतील. आणि म्हणून लोकगीतांचा विचार करता लोकगीतांचे स्वरूप प्रवाही असते.

शोधनिबंधाचा अध्ययन क्षेत्र:

शोधनिबंध लिहण्यासाठी संशोधन क्षेत्र निश्चित करणे आवश्यक आहे. विषय निश्चितीशिवाय संशोधन कार्य पूर्ण होऊ शकणार नाही याची जाण ठेऊन मी "आदिवासी लोकगीते" हा विषय शोधनिबंध म्हणून निवड केली आहे. कारण लोकसाहित्य हे व्यापक साहित्य आहे म्हणून लोकगीतेतून आदिवासी समाजातील, रूढी परंपरा, रितीरीवाज, समाजातील प्रश्न, मनोरंजन या शोधनिबंधाच्या अध्ययन क्षेत्रामध्ये मांडणी केली आहे.

संशोधन विषयाची सविस्तर मांडणी:

प्राचीन काळापासुन सूत, मागध, चारण, भाट, गंधर्व किन्नर अशी लोकगायकांची परंपरा अस्तित्वात होती. त्यांनीच लोकपरंपरेची जोपासना केलेली दिसते. वेद, पुराण, ब्राम्हणग्रंथ व जैन आणि बौध्द वाड्मयातही ठिकठिकाणी लोकगीतांचे उल्लेख आलेले आढळतात. यावरून आपणास लोकगीतांची प्राचीन परंपरा कळण्यास मदत होते. वेदपूर्वकाळात लोकगीतांची परंपरा पूर्णत: मौखिक असल्याने वेगवेगळ्या पिढ्यांवर त्याचे प्रतिबिंब सहज पडलेले आहे आणि काळानुरूप त्यामध्ये परिवर्तन होत गेलेले आहे. लोकगीत किंवा लोककाव्य यांचा प्राचीन उल्लेख इसवी सन पूर्व ३०० पर्यंत जातो. तिसऱ्या शतकापासून प्राकृत भाषेत लोकगीते रूढ असल्याचा पुरावा "गाथासप्तशती" वरून मिळतो. अपभ्रंश काळात लोकगीतांचे परंपरा ही पहावयास मिळते. यादवकाळात स्त्रिया दळणकांडण करताना ओव्या गात असे. मराठीतील महानुभाव वाड्मयातील स्त्रीगीते म्हणजे 'धुंढे' व 'धवळे' हे होय. आदिवासी लोकगीतांची परंपरा ही तितकीच प्राचीन आहे.

लोकगीतांची निर्मिती लोकजीवनात होत असल्यामुळे त्यातून लोकजीवनाचा आविष्कार घडत असल्यामुळे त्या लोकजीवनाच्या दृष्टीनेही वर्गीकरण करता येते. या वर्गीकरणामध्ये रूढी, प्रथा, विधी, सण–उत्सव यांच्याशी निगडीत असलेल्या लोकगीतांचा उल्लेख केला जातो. अशा वर्गीकरणात धार्मिक आणि पौराणिक आशयपर लोकगीते, सामाजिक आणि कौटुंबिक आशयपर लोकगीते यांचा ही समावेश वर्गीकरणामध्ये केले जाते.

दिवसभराच्या कामाने थकून गेलेली माणसे एकत्र जमून श्रमपरिहाराच्या हेतूने लोकगीते म्हणतात. गीतांची प्रेरणा श्रमपरिहार असते. तसेच मनातल्या भावना, दुःख हलके होण्यासाठी लोकगीतांची निर्मिती होत असते. अशुभ निवारण, मनोरंजन, विरेचन अशा प्रेरणा ही लोकगीतांच्या प्रेरणा आहेत. स्त्रीगीते, बालगीते, विवाहगीते ही सामाजिकतेशी निगडीत आहे तर संस्कारगीते व उपसकांची गाणी ही धर्मप्रेरणेशी संबधित आहे.

लोकगीतांची व्याप्ती त्याचा आशय, अभिव्यक्ती इत्यादी सर्व गोष्टींचा विचार करता लोकगीतांचे अचूक वर्गीकरण करणे अशक्य आहे. कारण गीतांचा आशय, लोकगीत गाणारी व्यक्ती, तिचे वय, यावरून लोकगीतांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न झाला आहे. आणि म्हणून मी वरील वर्गीकरणावरून नाशिक जिल्हयातील कोकणा, भिल्ल आणि वारली या आदिवासी लोकगीतांचे एकत्रीत वर्गीकरण मी खालील प्रमाणे केले.

आमची देव गाय भिवरा हो चरत जाय डोंगरा ।
माझे गायरीचा सींग । माझे गायरीचा सींग ।
जैसा महादेवाचा लिंग ।
आमची देव गाय भिवरा हो चरत जाय डोंगरा ।
माझ्या गायरीचा डोळा। माझ्या गायरीचा डोळा ।
जैसा लोण्याचा गोळा ।
आमची देव गाय भिवरा हो चरत जाय डोंगरा ।
माझ्या गायरीचा तोंड जसा आंबाडीचा बोंड
आमची देव गाय भिवरा हो चरत जाय डोंगरा ।
माझ्या गायरीची शेप जैसी ।
नागीन मारी झेप ।
आमची देव गाय भिवरा हो चरत जाय डोंगरा ।
माझ्या गायरीचा दात । माझ्या गायरीचा दात ।

जसा कमीचा भात ।

आमची देव गाय भिवरा हो चरत जाय डोंगरा ।

माझ्या गायरीची पाट कशी महादेवाची वाट

आमची देव गाय भिवरा हो चरत जाय डोंगरा ।

या कोकणा, भिल्ल आणि आदिवासी लोकगीतातील भाषा, शब्द योजना, कल्पकता, अर्थ लालित्य आणि त्यातील प्रसादिक गुण यांच्या मनोहारी मिलाप आपल्याला मोहून टाकते. लोकगीतेतील भाषेचे सौंदर्य संपन्न आहे. संपर्क शब्दांना जीवनाचा स्पर्श झाला असल्यामुळे ते जीवंत व अर्थपूर्ण वाटतात. गाईचे वर्णन करताना गाईचा डोळा तसा लोण्याचा गोळा, सिंग तसा महादेवाचा लिंग, तोंड आंबाडीचा बोंड, शेप नागीन मारीन झेप, गाईची पाट जैशी महादेवाची वाट असे सुरेख वर्णन या गीतातून दिसून येते.

काळी कपीला दुध का देईना?

मला बाळद्दी चारत नाय ना ?

कारे बाळद्या चारत नाय ना ?

मला म्हातारी भाकर देईना ?

का गं म्हातारी भाकर देईना ?

माझी सुन दळत नाय ना ?

का गं सुन दळत नाय ना ?

माझा जातं टकाऱ्या टाकत नाय ना ?

वाघबारस हा गुराखी यांचा सण असल्यामुळे गाईचे वर्णनात्मक गीत गातात. कपीला म्हणजे गाय. गाय दूध का देत नाही ? अशी तक्रार केली जाते गुराखी मला चारत नाही तर मी दुध कशी देऊ शेवटी घरच्या सुनेची तक्रार असते, माझं जातं टकाऱ्या टाकत नाय ना ?

चंदन तोडूनी चंदन तोडूनी पाडलास धरणीला

खांडून खुडूंनी बनविलास नागर

चंदन तोडूनी चंदन तोडूनी पाडलास धरणीला

त्या नागरला लावूनी सुतळी दोर

चंदन तोडूनी चंदन तोडूनी पाडलास धरणीला

त्या नागराला जुतले दोन नंद

चंदन तोडूनी चंदन तोडूनी पाडलास धरणीला

त्या जमिनीत पेरलास जोंधळा

त्या जोंधळ्याला पाहून घातला माळा

त्या त्या माळ्यावर विष्णू देवाचा खेळ

चंदन तोडूनी चंदन तोडूनी पाडलास धरणीला

वरील गीतातून शेतकऱ्याचे वर्णन केले आहे. नांगर हा चंदनाचा बनवून, त्याला काळे बैलाची जोडी, आणि जमिनीची मशागत करून जोंधळ्याचे पीक भरघोष आले आहे. आणि त्या जोंधळ्याची राखण विष्णू देव करीत आहे. या आदिवासी लोकगीतातून आपल्या कर्तबगारीचा आणि आयुष्याचाही धनी देवच आहे असे वरील गीतातून जाणवते.

म्या कोंबडा मारीला देवाच्या दारी

म्या कोंबडा मारीला देवाच्या दारी

माझ्या कोंबड्यांची टोक जैशी कडकी दाणा टोच

म्या कोंबडा मारीला देवाच्या दारी

माझ्या कोंबड्यांची आर जैशी तलवारीची धार

म्या कोंबडा मारीला देवाच्या दारी

माझ्या कोंबड्याचा डोळा तैसा लोण्याचा गोळा

म्या कोंबडा मारीला देवाच्या दारी

माझ्या कोंबड्याची जीभ जैसी चौमुलक्याची वीज

म्या कोंबडा मारीला देवाच्या दारी

जनावरांचे (गाय, बैल, बकरी) वाघापासून किंवा नागापासून रक्षण करण्यासाठी वाघबारसच्या दिवशी प्रत्येक गावाच्या वेशीजवळ पूजा करण्याची प्रथा नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजामध्ये रूढ आहे. तेव्हा वाघ हा जंगलाचा राजा असल्यामुळे त्याला प्रसन्न करण्यासाठी कोंबडा बळी दिला जातो. त्यावेळी कोंबड्याचे वर्णन असे, टोक जैसी कडकी दाणा टोच, आर जैसी तलवारीची धार, डोळा तैसा लोण्याचा गोळा, जीभ जैसी चौमुलख्याची वीज अशी कल्पना केली आहे. आदिवासी लोकगीतामध्ये अफाट कल्पनाशक्ती आहे. गीतामध्ये पुनरावृत्तीला महत्व असते. ही लोकगीते पिढ्यानपिढ्या टिकून आहेत.

'थिंडवाळी' म्हणजे दिवा. हा दिवा मोळू या गवतापासून तयार केला जातो. त्याला कपाशी वात लावून, त्या दिव्यांनी रात्री प्रत्येक घरी जाऊन गुराखी हा गाईला ओवाळीत गाणी म्हणतात.

देव गायीच्या शिंगा आहेत नादर

गेले गेले रे उभे दांडी
मोर लावील तुरकी चाल लावील
गेले गेले आडवे या दांडाले
आडवे दांडाचा वारा आहे पाचोरा
घेले गेले या दुधी या तळ्याला
दुधीया तळ्याचा पाणी आहे शितळ
गायी गेले रे पाडवी वडाले
देव गायीच्या शिंगा आहेत नादर

आदिवासी लोकांच्या बहुतेक गाण्यात रचना कौशल्य असते, सैलपणा असतो. पण भावनांचा सहजस्फूर्त आविष्कार हे आदिवासींच्या गाण्याचे महत्वाचे वैशिष्ट्य असते. त्यांच्या गीतातून पृथ्वीची निर्मिती, प्राणी, पक्षी, आकाश, डोंगर यांच्या उत्पत्ति कथाही गाण्यातून येतात. वरील मोर हा गाईला तुरकी चालण्यास शिकवितो. तसेच वड, पाण्याचा तळा यांचा ही उल्लेख वरील गीतात आले आहे.

आदिवासी मंत्रात्मक लोकगीते:

आदिवासी लोकगीतांमध्ये मंत्र हे शब्दबध्द असतात. याचा अर्थ शब्दाच्या उच्चारात एक प्रकारची शक्ती सामावलेली असते. लोकांनीच शब्दांना मंत्र सामर्थ्य दिले. एखादा विधी पार पाडीत असताना त्या विधीशी परंपरेने जोडले गेलेले गीत म्हटले नाही तर संकट येईल, अशी समजूत आदिवासी लोकमानसात असते. सर्पदंश उतरताना मंत्र, रात्रीच्या बाधापासून वेळी स्वरक्षणात्मक मंत्र, अंग दु:खीचे मंत्र इत्यादी. तसेच आदिवासी मध्ये आजारी माणसावर 'झाडण' घातली जाते म्हणजे मंत्रात्मक गाणी म्हटली जातात. ती गाणी खालील प्रमाणे आहेत.

१

'रात्रीच्या संरक्षणासाठी'
वाट बांधू घाट बांधू
दगड बांधू धोंड बांधू
शिव बांधू शिवटा बांधू
भूताळी बांधू माझ्या बांधल्या
बंदसना करसना तुला आण
म्हादेवाची पारवतीची

सद्‌गुरूची ...

२

वाघ्या देवा जोग्या देवा
आम्ही आलो या वणी
तुम्ही जा दुसऱ्या वणी
मेळवात मेळ काळ्यादेव
ब्रम्हदेव याची आण
माता, पिता, गुरू देवाची
सद्‌गुरूची ...

३

'विंचीचा मंत्र'

आवरी गवरी चाचा चवरी
मोहर माया कोकड भाषा
टाकीण चाच्या उतरविण इच्या
उतरसणा करसना तुला आण
महादेवाची पार्वतीची
माता– पिताची सद्‌गुरूची ...

वरील मंत्रात्मक गाणीतून असे दिसून येते की, लोकगीत हे विशिष्ट विधींशी आचारधर्मांशी चिकटून असतात. आदिवासी समाजामध्ये अंधश्रध्दा फार मोठ्या प्रमाणात दिसून येते. जर मंत्र म्हटले, तर वाघ सुध्दा आपल्यावर हल्ला करू शकत नाही. ही त्यांच्या मध्ये, मोठी समजूत आहे. 'मेळवात मेळ काळ्या देव' काळ्या देव म्हणजे 'यम' याला शपथ ते ब्रम्हदेव, आई–वडील आणि गुरू यांची असल्यामुळे वाघ आपल्याला खाऊ शकणार नाही, असा आत्मविश्वास त्यांच्यात असतो. हे मंत्र फक्त भगत लोकांनाच माहित असतात. आज आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगातही आदिवासी लोकांमध्ये मंत्र–तंत्र या विषयी जागृती झाली नाही. याची जाणीव लोकगीते संकलित करताना मला झाली आहे.

समारोप:

लोकगीतांची निर्मिती प्रक्रिया ही सहज होत असते. आणि लोकगीतात संगीत आलेले असते. आणि आपल्या मनातील सुख–दु:खाच्या भावना लोकगीतामध्ये उलगडत लोकगीत हे

प्रवाही व परिवर्तनीय असते. माणसाच्या सामुदायिक जीवनाचा अविष्कार लोकगीतांमधून होतो. लोकसंस्कृती, लोकविश्वास आणि लोकपरंपरा यांच्या अभिव्यक्तीतून लोकगीतांचे स्वरूप कळून येते. लोकगीतांची भाषा असते. प्रत्येक समाज गटाची बोलीभाषा अलग असते. लोकगीतांचे स्वरूप हे व्यक्तीपरत्वे, जातीयपरत्वे, धर्मपरत्वे स्थलकालपरत्वे अशा प्रकारे लोकगीतांचे स्वरूप दिसून येते.

संदर्भ सूची:


१. डॉ. शरद व्यवहारे: लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, जानेवारी १९९९.

२. डॉ. पुरूषोत्तम कालभूत: लोकसाहित्य स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, नागपूर – १२.

३. डॉ. मोहन पाटिल: लोकसाहित्य संकल्पना व स्वरूप, मानसन्मान प्रकाशन, पुणे–५

४. डॉ. विश्वनाथ शिंदे: लोकसाहित्य मीमांसा, प्रकाशक स्नेहवर्धक, पुणे – ३०, प्रथम आवृत्ती, २६ जानेवारी १९९८.